मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त राबविण्यात येत असलेल्या ३७ पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये हस्तांतरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१८/प्र.क्र.१७८/पापु-१९

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०८ मार्च, २०१९

<u>वाचा</u>

१) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
२) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन पत्र क्रमांक: मुपेयो-२०१८/प्र.क्र.१७८/पापु-१९, दिनांक ०३ जानेवारी, २०१९
३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीच्या ३० व्या बैठकीचे इत्तिवृत दिनांक ११ फ़ेब्रुवारी, २०१९
४) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०
५) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक २२ जानेवारी, २०१४
६) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ०९ जुलै, २०१४
७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४
८) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक १६ फ़ेब्रुवारी, २०१५
९) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३४/पापु-०७, दिनांक २० फ़ेब्रुवारी, २०१५
१०) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १० मार्च, २०१५
११) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५
१२) शासन परिपत्रक क्रमांक: मुपेयो २०१७/प्र.क्र.१८६/पापु-१९, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८
१३) संचालक (पाणी), पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांकः W-११०४२/०१/२०१५-Water-१, Dated 11th May, २०१५.
१४) सह सचिव, पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांकः D.O.No.W-११०४१/९/२०१५-Water-I, Dated २९th June, २०१५
१५) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१७१/पापु-०७, दिनांक ११ फ़ेब्रुवारी, २०१९

प्रस्तावना:-

केंद्र शासनाने संदर्भाधीन क्रमांक १३ येथील दिनांक ११ मे, २०१५ च्या पत्रान्वये प्रगतीपथावरील ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे सूचित केले असून संदर्भाधीन क्रमांक १४ येथील दिनांक २९ जून, २०१५ च्या पत्रान्वये जास्त कालावधीसाठी रखडलेल्या पाणी पुरवठा योजनांची बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आणली आहे. त्यानुसार (१) फ्लोराईड व आर्सेनिक बाधित गावे/वाड्यांसाठी कायमस्वरुपी व तात्पुरती उपाययोजना (२) संसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट गावे/वाड्या व (३) राज्यामध्ये प्रगतीपथावर योजना नसल्यासच नवीन योजना घेणे या वर्गवारीतील गावे/वाड्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नवीन योजना घेण्यात येऊ नयेत अशा सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत.

केंद्र शासनाने उपरोक्त वर्गवारीतील गावे/वाड्या-वस्त्या वगळता अन्य ठिकाणी नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यास मनाई केली असल्याने, राज्य शासनाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वत:चा सर्वसमावेशक असा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सद्य:स्थितीत केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हागणदारीमुक्त गावांमध्ये पाणीपुरवठा योजना घेण्यास परवानगी दिली असल्याने व संपुर्ण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला असल्याने, तसेच प्रगतीपथावरील योजनांवरील आर्थिक दायित्व कमी झाले असल्याने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त राबविण्यात येत असलेल्या ३७ पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये हस्तांतरित करणे विचाराधीन होते.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या दिनांक २०.०९.२०१८ रोजीच्या नवी दिल्ली येथील आढावा बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीच्या (SLSSC) दिनांक ११.०२.२०१९ रोजीच्या ३० व्या बैठकीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त राबविण्यात येत असलेल्या रु.१०३१.७० कोटी इतक्या किंमतीच्या ३७ पाणीपुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदर ३७ पाणीपुरवठा योजनांना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेली प्रशासकीय मंजूरी रद्द करुन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने प्रशासकीय मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्यात आलेल्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त राबविण्यात येत असलेल्या सोबतच्या परिशिष्ट-१ मधील ३७ पाणीपुरवठा योजनांना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेली प्रशासकीय मंजूरी रद्द करण्यात येत आहे. तसेच सदर पाणीपुरवठा योजना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून वगळण्यात येत आहेत.

२. राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीच्या दि.११ फ़ेबुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सोबतच्या परिशिष्ट-१ मधील रु.१०३१.७० कोटी इतक्या किंमतीच्या ३७ पाणीपुरवठा योजनांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

I. **सदर योजनांच्या मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत स्विकृत केलेल्या निविदा रद्द न करता, केवळ अंमलबजावणी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात यावी. तसेच सदर योजना प्रगतीपथावर असल्याने कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामे पुर्ण करण्यात यावीत.**

II. सदर योजनेचा समावेश केंद्र शासनाच्या IMIS या प्रणालीवर करण्यात यावा.

III. **सदर योजनांची अंमलबजावणी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या स्थायी आदेशातील मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात यावी.**

IV. शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय योजनेत कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत. योजनेतील खर्चात वाढ होत असल्यास त्यास पुर्वपरवानगी शिवाय जादा खर्च करण्यात येऊ नये.

V. योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने योजना पुर्णत्वाचा दाखला सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

VI. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास अनियमिततेस जबाबदार संबंधित अधिकारी/ कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील.

VII. योजनेच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व योजनेच्या पुर्णत्वाचे दाखले संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त करुन घेवून शासनास सादर करण्याची जबाबदारी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो), बेलापूर यांची राहील.

२. या योजनांवर सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये झालेला खर्च राज्य हिश्यात दर्शविण्यात यावा. तसेच सन २०१८-१९ व त्यापुढे होणारा खर्च केंद्र व राज्य शासनाच्या उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१६१७३१८५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: CN = Sham Lal Goyal, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Watersupply And Sanitation Department
Date: 2019.03.25 16:36:12 +05'30'

(शाम लाल गोयल)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१४. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१५. अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१६. कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१७. निवडनस्ती, कार्यासन (पापु-१९)

शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१८/प्र.क्र.१७८/पापु-१९, दि.०८ मार्च, २०१९ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

अ.क्र	नळ पाणीपुरवठा योजनेचे नाव	जिल्हा	MRDWP (४% ETP व १% TPI सह)मंजूर किंमत (रु.लक्ष)	MRDWP मंजूरीचा दिनांक	NRDWP (९% ETP सह) नुसार किंमत (रु.लक्ष)
१	मौ. खडवली व ५ गावे (ता.कल्याण)	ठाणे	१११८.१२	२६.७.२०१७	११६०.७२
२	मौ. शिरगाव मुंढे (ता. चिपळूण)	रत्नागिरी	६७२.४८	१८.१०.२०१७	६९८.१०
३	मौ. मंचर (ता. आंबेगाव)	पुणे	१३७२.२७	०९.८.२०१७	१४२४.५५
४	मांजरी (ता.हवेली)	पुणे	४१७०.०४	२५.११.२०१६	४३२८.९०
५	मौजे फुरसुंगी उरुळी द्वेवाची (ता. हवेली)	पुणे	७२८८.०७	२८.११.२०१६	७५६५.७१
६	मौ. शिक्रापूर (ता. शिरुर)	पुणे	१४०८.४७	३१.१२.२०१६	१४६२.१३
७	मौ. आरग (ता. मिरज)	सांगली	९६६.८१	२६.०४.२०१७	१००३.६४
८	मौ. कुंडल (ता. पलूस)	सांगली	५२५.९१	२९.०१.२०१८	५४५.९४
९	मौ. गार्डी (ता.खानापूर)	सांगली	२६२.१९	०५.५.२०१८	२७२.१८
१०	मौ. मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर)	सोलापूर	११२६.८५	२६.०४.२०१७	११६९.७८
११	मनेगाव व २२ गावे (ता. सिन्नर)	नाशिक	२०३४.८१	१३.९.२०१७	२११२.३३
१२	वाढीव एकलहरे (ता. नाशिक)	नाशिक	७५३.८६	०१.०२.२०१८	७८२.५८
१३	भुसावळ तालुक्यातील ३१ गांवे	जळगाव	३३७४.३९	०३.०३.२०१७	३५०२.९४
१४	मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील ५१ गांवे	जळगाव	४५५२.६१	०३.०३.२०१७	४७२६.०४
१५	मौजे.कसोदा (ता.एरंडोल)	जळगाव	१०९९.७२	२३.०३.२०१७	११४१.६१
१६	मौ. सुपा (ता. पारनेर)	अहमदनगर	१४६१.१०	१९.७.२०१७	१५१६.७६
१७	मौ. मिरजगांव (ता. कर्जत)	अहमदनगर	९९९.२८	२५.०४.२०१७	१०३७.३५
१८	कोकमठाण (ता. कोपरगाव)	अहमदनगर	८३५.१६	२४.०५.२०१८	८६६.९८
१९	चापानेर व २ गावे (ता.कन्नड)	औरंगाबाद	५८३.१२	१०.११.२०१६	६०५.३३
२०	जालना जिल्हयातील १७६ गांवे	जालना	२३४४१.२९	२८.०९.२०१६	२४३३४.२९
२१	मंठा व परतुर तालुक्यातील ९२ गांवे ग्रीड	जालना	११७३९.०४	१८.०६.२०१८	१२१८६.२४
२२	मौ. चारठाणा (ता. जिंतूर)	परभणी	४००.१४	१२.०३.२०१८	४१५.३८

अ.क्र	नळ पाणीपुरवठा योजनेचे नाव	जिल्हा	MRDWP (४% ETP व १% TPI सह)मंजूर किंमत (रु.लक्ष)	MRDWP मंजूरीचा दिनांक	NRDWP (९% ETP सह) नुसार किंमत (रु.लक्ष)
२३	पालम तालुक्यातील ६५ गांवे ग्रीड योजना	परभणी	५६६४.०९	१८.०६.२०१८	५८७९.८६
२४	मौ. हट्टा (ता. वसमत)	हिंगोली	६२५.४६	२५.०४.२०१७	६४९.२९
२५	अंजनगाव व दर्यापूर तालुक्यातील ७९ गावे	अमरावती	४८२८.४५	३१.०३.२०१७	५०१२.३९
२६	मौ. वाठोडा शुक्लेश्वर (ता.भातकुली)	अमरावती	९३.८८	१९.४.२०१७	९७.४६
२७	मौ. रिध्दपूर (ता. मोर्शी)	अमरावती	९२८.०२	०१.७.२०१७	९६३.३७
२८	रनाळा-येरखेडा (ता.कामटी)	नागपूर	१७८६.३६	२८.०९.२०१६	१८५४.४१
२९	मौ. मनसर (रामटेक)	नागपूर	६४६.८८	२७.०६.२०१८	६७१.५२
३०	मौ. पिंपरी मेघे व १३ गांवे	वर्धा	२७४४.४०	१९.०४.२०१७	२८४८.९५
३१	बल्लारपूर तालुक्यातील १८ गावे	चंद्रपूर	३५७८.०७	०५.१०.२०१६	३७१४.३८
३२	मुल तालुक्यातील २४ गावे	चंद्रपूर	४६००.००	०५.१०.२०१६	४७७५.२४
३३	मौ.तळोधी (बाळापूर)	चंद्रपूर	५८४.६८	२९.१०.२०१६	६०६.९५
३४	मौ. कुनघाडा ३ गांवे (ता. चार्मोशी)	गडचिरोली	५११.८१	०३.०३.२०१७	५३१.३१
३५	मौ. येनापूर १३ गांवे (ता. चार्मोशी)	गडचिरोली	८६४.८२	०३.०३.२०१७	८९७.७७
३६	मौ. कुरुड १६ गांवे (ता. चार्मोशी)	गडचिरोली	८२७.६५	०३.०३.२०१७	८५९.१८
३७	मौ. आल्लापली २ गांवे (ता. अहेरी)	गडचिरोली	९१३.८६	०९.०३.२०१७	९४८.६७
	एकूण (३७)		**९९३८४.१६**		**१०३१७०.२२**

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: CN = Sham Lal Goyal, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Watersupply And Sanitation Department
Date: 2019.03.25 16:36:37 +05'30'

(शाम लाल गोयल)

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन